# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 22.09.2024** **वार – रविवार**

---

**<u>मानवा धिकार</u>**

पुण्यातल्या एका खासगी कंपनीत काम करणाऱ्या मुलीनं अतिरीक्त कामाच्या दबावाला कंटाळून आत्महत्या केली होती. या घटनेची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं स्वतःहून दखल घेतली आहे. याप्रकरणी श्रम आणि रोजगार मंत्रालयाने तपास करून चार आठवड्यात अहवाल द्यावा, अशी सूचना आयोगानं केली आहे. पीडित मुलगी केरळची रहिवासी असून ती कंपनीत चार्टड अकाऊंट म्हणून कार्यरत होती. या घटनेवर मानवाधिकार आयोगानं चिंता व्यक्त करत खासगी कंपन्यांमध्ये जागतिक मानवी हक्क अधिकारांचं योग्य पद्धतीनं पालन केलं जात आहे की नाही याचा आढावा घेण्याच्या सूचनाही श्रम आणि रोजगार मंत्रालयाला केल्या आहेत.

**<u>'रनफॉरफोर्ट'मॅरेथॉन</u>**

साडेतीनशे वर्षानंतरही आपल्या सर्वांना ऊर्जा देणारे छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या गड किल्ल्यांशी आपलं भावनिक नातं जोडलं गेलं आहे; ही ऊर्जा युनेस्कोलाही भावली आहे, असं प्रतिपादन पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी आज केलं. शिवनेरी, लोहगड आणि राजगड किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळाच्या यादीत नामांकनासाठी प्रस्तावित करण्यात आलं आहे; त्या अनुषंगाने जनजागृतीसाठी 'रन फॉर फोर्ट' मॅरेथॉन स्पर्धेचं आज सकाळी आयोजन करण्यात आलं होतं. या स्पर्धेचा प्रारंभ आमदार सिद्धार्थ शिरोळे आणि जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यूनेस्कोची समिती २७ ते ३० सप्टेंबर या कालावधीत शिवनेरी, लोहगड आणि राजगड किल्ल्यांना भेटी देणार आहेत. या पार्श्वभूमीवर सर्व तयारी करण्यात आली आहे, असंही त्यांनी यावेळी सांगितलं. यावेळी शिवकालीन दुर्मिळ शास्त्रांचं प्रदर्शनही आयोजित करण्यात आलं होतं.

**<u>'कर्मवीरचित्ररथमिरवणूक'</u>**

रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३७व्या जयंतीनिमित्त आज पासून 'कर्मवीर सप्ताह'चे आयोजन करण्यात आलं आहे. आज सकाळी महाविद्यालयात 'कर्मवीर चित्ररथ मिरवणूक' काढण्यात आली.

**<u>विहिर</u>**

पुण्यातील सर्व जुन्या विहिरी चिन्हांकित करून तिथे फलक लावण्याची व्यवस्था करणं आवश्यक आहे; जागरूक पुणेकर समितीने याबाबत पुणे  महापालिका आयुक्तांना पत्र दिलं आहे. या फलकामुळे भविष्यात अपघात टाळता येतील असं या पत्रात म्हटलं आहे. सिटी पोस्टाच्या आवारात शुक्रवारी महापालिकेच्या जेटिंग ट्रकच्या वजनाने अचानक जुन्या विहिरीवरील ब्लॉक कोसळून ट्रक विहिरीत गेल्याची घटना घडली होती. त्यानंतर जागरूक पुणेकर समितीनं ही मागणी केली आहे.

**<u>सत्कार</u>**

आपली लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे; या आपल्या लोकशाहीचं संगोपन करणं प्रत्येक भारतीयाचं कर्तव्य आहे; त्या आधारे आपण जगाचं नेतृत्व करू शकतो असा विश्वास डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष खासदार शाहू छत्रपती महाराज यांनी व्यक्त केला. लोकसभेचे सदस्य म्हणून निवडून आल्याबद्दल शाहू छत्रपती महाराजांचा डीईएसच्या वतीने नुकताच सन्मान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

**<u>देशीगोवंश</u>**

अखिल भारतीय कृषी गोसेवा संघाचे पश्चिम महाराष्ट्र विभागाचे अध्यक्ष मिलिंद एकबोटे आणि सहकाऱ्यांचं गेले तीन दिवस आळंदीमध्ये सुरु असलेलं देशी गोवंश बचाव जन आंदोलन मागे घेण्यात आलं आहे. मंत्रिमंडळ बैठकीत हा मुद्दा चर्चेला घेऊन तात्काळ मार्गी लावण्याचं आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आलं. देशी गोवंशासाठी प्रतिदिन, प्रति गोवंश शंभर रुपयाचे अनुदान मिळावे. राज्यातील गायरानाची जमीन गोपालन, चारा लागवडसाठी उपलब्ध करून द्यावी. रस्त्यावरील मोकाट फिरणाऱ्या गोवंशाच्या संरक्षणासाठी ठोस उपाययोजना करण्यात यावी. आणि आळंदीसारखी तिर्थक्षेत्र अवैध धंदेमुक्त असावीत या चार मागण्यांसाठी मिलिंद एकबोटे आणि त्यांचे सहकारी बेमुदत उपोषणाला बसले होते.

**<u>प्रदर्शन</u>**

जपानी कला, संस्कृती आणि कारागिरी यांचा त्रिवेणी संगम असलेलं 'लँडस्केप अँड लिजेंड्स : ए जपानी कल्चर मोझॅक' हे प्रदर्शन पुण्यात यशवंतराव चव्हाण कला दालनात भरवण्यात येणार आहे. 'गेट सेट गो'च्या वतीने येत्या २७ ते २९ सप्टेंबर या कालावधीत सकाळी ११ ते संध्याकाळी ८ या

वेळेत हे प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुलं असेल, अशी माहिती संयोजक अमित कुलकर्णी यांनी दिली.

**<u>संत्राप्रक्रियाकेंद्र</u>**
आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणी योजनेतंर्गत प्रस्ताव सादर करण्यास ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. योजनेच्या अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या मुख्यालयाच्या प्रकल्प विभागाशी संपर्क करण्याचे आवाहन पुणे मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी केले आहे.

**<u>बाजारसमिती</u>**
पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून नव्वद ते शंभर ट्रक फळभाज्यांची आवक झाली. पितृ पंधरवडा असल्याने भाज्यांना चांगली मागणी आहे. त्यामुळे टोमॅटो, फ्लॉवर, शेवगा, मटार, सिमला मिरची आणि गाजर यांच्या भावात वाढ झाली. पालेभाज्यांच्या भावात मात्र मोठी घसरण झाली. सर्वच फळांचे भाव स्थिर झाले असून फुल बाजारात मंदीचं वातावरण आहे.

**<u>हवामान</u>**
पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 31 अंश तर किमान तापमान 21 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सियस होतं. उद्या हवामान सामान्यतः ढगाळ राहील आणि कमाल तापमान 30 अंश सेल्सियसच्या आसपास राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**